# विविध देशातील निषेध मोर्चे आणि त्यांची निष्पत्ती

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

जगभर लोक या ना त्या मागणीसाठी, निषेधासाठी सतत रस्त्यावर येतात. स्थानिक मागण्या निरनिराळ्या असतात पण राज्य-संस्थेच्या विशिष्ट धोरणांचा निषेध किंवा राज्यसंस्थेचाच निषेध हा समान धागा दिसतो. अलिकडे या निषेधात लक्षणीय वाढ झालेली दिसते.

काही वैशिष्ट्यपूर्ण उदाहरणे पाहू.

प्रथम इराक. इराकहून येणाऱ्या बातम्या एरवी फक्त दहशतवादी हल्ल्यांच्या किंवा इराकी सैन्याच्या इस्लामिक स्टेटविरुद्धच्या लढाईच्या असतात. पण फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात इराकी निवडणूक आयोगाविरुद्धच्या निदर्शनाची बातमी आली. 'हा आयोग भ्रष्ट आहे, त्याची पुनर्रचना करा' ही मागणी होती. आजवर अशी निदर्शने अमेरिकन हस्तक्षेप व इराकमधील त्यांचे वास्तव्य याविरुद्ध असत. पण एका शासकीय मागणीसाठी अशी निदर्शने होणे ही मर्यादित तरी दिलासा देणारी घटना वाटते. 'मर्यादित' यासाठी, की या निषेधात दोन पोलीस आणि पाच निदर्शक मरण पावले, दोनशेहून अधिक लोक जखमी झाले. शिवाय निदर्शक मोक्तादा अल सद्र या शिया धर्मगुरूचे अनुयायी होते. तो अमेरिका, नंतर अमेरिकेने आणलेली इराकी राजवट यांच्या सतत विरोधात असतो व इराणच्या संपूर्ण पाठिंब्यावर उभा आहे. म्हणजे, निषेधाला राजकीय बाजूही होती.

दुसरे उदाहरण पूर्व युरोपातील रोमानिया या देशाचे. तेथील रशियाचे बाहुले असणारी कम्युनिस्ट राजवट १९८९ ला उलथली गेली व लोकशाही आली. पण पूर्वीच्या राजवटीतील भ्रष्ट मंडळी किंवा त्यांचे वारसदारच परत या ना त्या रूपात सत्तेवर आले. त्याविरुद्धचा लोकांचा खदखदत असलेला असंतोष फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात रस्त्यावर आला. या असंतोषाचे प्रमाण १९८९च्या प्रचंड निषेधासारखेच होते. तात्कालिक कारण म्हणजे, सध्याच्या राजवटीने भ्रष्टाचाराविरुद्ध कोणावर कारवाई करता येईल याची व्याख्या कायद्याने बदलण्याचा प्रयत्न केला. तोही रातोरात. ३२ लाख रुपयांहून जास्त अफरातफर असेल तरच तो कायद्याच्या दृष्टीने गुन्हा - असा हा प्रस्ताव होता. त्यामागचे कारण म्हणजे, सत्ताधीश पक्षाचा एक नेता १७ लाख रुपये लाच घेतल्याच्या आरोपात अडकला आहे. त्याला सोडवण्यासाठी ही मखलाशी. पण ती सरकारच्या अंगाशी आली. हे धोरण जाहीर झाल्याझाल्या एका तासातच १०,००० निषेधक राजधानीत रस्त्यावर आले, पुढच्या रात्री देशभरच्या ५० शहरात अडीच लाख लोक जमले आणि या प्रस्तावाच्या शिल्पकाराला - कायदेमंत्र्याला - ९ फेब्रुवारीला राजीनामा द्यावा लागला. जनमानस पहाता सरकारने प्रस्ताव मागे घेतला. तरीही पाच लाखाहून जास्त लोक १२ फेब्रुवारीला विरोध करत होते - राजवटीच्या राजीनाम्यासाठी.

इंडोनेशिया या जगातल्या सर्वात जास्त मुस्लीम असणाऱ्या देशाच्या राजधानीचा - जकार्ताचा - महापौर ख्रिश्चन आहे. त्याने निवडणूक प्रचारादरम्यान मुस्लीम मूलतत्त्ववादी कुराणातील एका वचनाचा चुकीचा अर्थ लावत आहेत असे विधान केले. त्यामुळे मुस्लीम कट्टर-पंथीय चिडले. 'हा माणूस इस्लामचा अपमान करत आहे, त्याला फासावर चढवा' या मागणीसाठी हजारोंनी लोक डिसेंबरमध्ये रस्त्यावर आले. त्या दडपणाने त्याच्यावर आता खटला चालू आहे. इराकमधील मोर्चासारखेच यामागे खरे कारण निराळे - मुस्लीम-ख्रिश्चन विद्वेष - आहे.

याच सुमारास डिसेंबरपर्यंतच्या सततच्या मोठ्या मोर्चांमुळे व संसदीय कारवाईमुळे दक्षिण कोरियाच्या अध्यक्षांना (महिला) सत्ता सोडावी लागली. (ते प्रकरण आपल्याकडच्या जयललिता-शशिकला दोस्ती-भ्रष्टाचारासारखे. कोरियन अध्यक्षांचीही एक विश्वासू मैत्रीण होती व अध्यक्षपदाच्या गैरवापराने या मैत्रिणीच्या संस्थांना अमाप पैसा मिळाला.) आता त्यांची चौकशी चालू आहे. ऑगस्टमध्ये ब्राझीलच्या अध्यक्षांनाही (त्याही महिला) अशाच लोकक्षोभाने पदच्युती व संसदीय चौकशीला सामोरे जावे लागले. तेथे लाखो विरोधक व समर्थक अशा दोनही बाजूंचे मोर्चे निघाले होते. वेनेझुएला या दक्षिण अमेरिका खंडातील दुसऱ्या देशात विद्यमान अध्यक्षाविरुद्ध असाच निषेध चालू आहे पण तो सत्ता सोडत नाही.

ऑक्टोबरमध्ये पोलंडमध्ये 'गर्भपात हा स्त्रीचा अधिकार आहे' या मुद्द्यावर स्त्रियांनी सरकारच्या प्रस्तावित गर्भपात बंदी कायद्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात निदर्शने केली व हा प्रस्ताव रद्द झाला.

अरब वसंतादरम्यानही (२०११ पासून) मिश्र चित्र दिसले. फक्त ट्युनिशियाच्या अध्यक्षाने लोकांच्या सार्वजनिक विरोधापुढे लगेच देशातून पळ काढला. आणि जरा झगडून का होईना,

इजिप्तमध्येही अध्यक्ष पदच्युत झाला. (नंतर निवडणुकाही झाल्या पण त्यानंतरच्या लष्करशाहीने असे निषेध आता दडपले आहेत.) मध्य-पूर्वेत इतरत्र असेच मोर्चे निघाले पण ते दडपण्यात आले. तेव्हापासून येमेन, सीरिया तर यादवीच्या गर्तेत आहेत - लाखो बळी, लाखो निर्वासित.

आता ट्रम्पच्या अमेरिकन अध्यक्षीय पद-ग्रहणानंतरचे निषेध मोर्चे पाहू. २० जानेवारीला शपथ-विधी चालू असतानाच विरोधकांनी निषेध करायला सुरुवात केली होती. २१ जानेवारीपासून अमेरिकेतील विविध शहरात स्त्रियांनी ट्रम्पविरोधी मोर्चे काढले. राजधानी वॉशिंग्टन, न्यू यॉर्क, शिकागो, लॉस एन्जेलेस, बोस्टन वगैरेत मिळून दहा ते पंधरा लाख स्त्रिया रस्त्यावर आल्या. प्रमुख निषेध अशासाठी - ट्रम्पची स्त्रियांना भोग्य वस्तू मानण्याची वृत्ती, गर्भपातविरोधी संभाव्य धोरण (ते अस्तित्वात येत आहे), जास्तीत जास्त नागरिकांना आरोग्यसेवा अल्प-खर्चात मिळावी ही ओबामा सरकारची योजना रद्द करणे - तसे होणे स्त्रियांना अधिक हानिकारक (ती प्रक्रिया चालू झाली आहे). तसेच ट्रम्पविरोधी मोर्चे मेक्सिको, जर्मनी, हॉलंड, फ्रांस यांच्या राजधान्यांत झाले.

आगीत तेल म्हणून ट्रम्पने रोज नवनवीन फतवे (खास अध्यक्षीय राजपत्रे - त्यांना संसदेची पूर्वसंमती लागत नाही) काढण्याचा सपाटा लावला. पहिल्या काही दिवसातच २२. त्यातील तीन पाहू -

मेक्सिको आणि अमेरिकेमध्ये २००० किलोमीटरची भिंत बांधणे जेणेकरून अनधिकृत मेक्सिकन अमेरिकेत येऊ शकणार नाहीत. या भिंतीचा खर्च मेक्सिको देईल! मेक्सिकोने खर्च का द्यावा आणि तो गरीब देश हा खर्च कसा देणार? त्या देशाने खर्च करणारच नाही हे स्पष्ट केले. मग मेक्सिकोतून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर अमेरिका २०% कर लावेल हे ट्रम्पचे प्रतिपादन. हा कर त्या भिंतीसाठी वापरला जाईल! वस्तुत: या कराने महाग होणाऱ्या वस्तू विकत घेणार ते अमेरिकनच. म्हणजे अमेरिकन उपभोक्ताच ती भिंत बांधणार. या भिंतीचे पर्यावरणीय व सामाजिक परिणामही आजवर नीट माहिती नाहीत. त्यामुळे दोनही देशात याविरुद्ध असंतोष सुरु झाला. मेक्सिकोत निषेध-मोर्चे निघाले.

मग सात मुस्लीम-बहुल देशातून अमेरिकेला लोक येता कामा नयेत हा फतवा. याचे कारण दिले गेले ते म्हणजे ट्विन टॉवर्सवरचा २००१ चा हल्ला. विशेष म्हणजे, सौदी अरेबिया आणि इजिप्त या ज्या दोन देशांतील दहशतवाद्यांनी हा हल्ला केला होता, त्यांचा या देशांच्या यादीत समावेश नाही! आणि ज्यांचा समावेश आहे, त्यातील कोणत्याच नागरिकाने अमेरिकनांवर अमेरिकेत हल्ला केलेला नाही. याचे प्रतिसाद जगभर उमटले, जास्त-करून मध्य-पूर्वेत.

तिसरा फतवा तेल वाहतूक करणाऱ्या दोन पाईपलाईन्सना संमती देणे. हे दोनही प्रकल्प पर्यावरणवादी व त्या प्रदेशातील अमेरिकेतील मूळ रहिवासी - रेड इंडियन्स - यांच्या विरोधाने स्थगित झाले होते. (आपल्याकडच्या नियमगिरीप्रमाणे). त्यावरही निषेध-मोर्चे होत आहेत.

मध्य-पूर्व सोडता वरील सर्व राष्ट्रे निर्वाचित लोकशाही आहेत. मोर्चा, सार्वजनिक निषेध यांना ते वातावरण आवश्यक असते. हुकूमशाहीत मोर्चे निघत नाहीत. पण मोर्चा हा घटनेने दिलेला हक्क नसून ते अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे स्वरूप आहे आणि ते संयमाने वापरावे हे बऱ्याचदा दुर्लक्षिले जाते. मुळात प्रश्नाचा नीट अभ्यास, मग संबधित अधिकाऱ्यांशी, लोक-प्रतिनिधींशी चर्चा, ती असफल झाल्यास मोर्चा या क्रमाने वाटचाल होतेच असे नाही. हाक दिली की लोक येतील या विश्वासावर अनेकदा मोर्चे निघतात.

निवडणूक प्रक्रियेवरचा लोकांचा विश्वास उडणे, दोन निवडणुकांच्या दरम्यान सरकारी धोरणांना विरोध करण्याला वाव नसणे, दिवसेंदिवस तीव्र होत चाललेल्या सांप्रदायिक अस्मिता (पटेल, मराठा) - त्यांचे राजकारण वगैरे अनेक पदर या उत्स्फूर्त किंवा नियोजित सामूहिक निषेधामागे असतात. मोर्चात सामील होणारेही 'हौशे, नवशे, गवशे' असतात. त्यामुळे मोर्चा पारंपरिक कसोटीवर (उद्दिष्ट बदल झाला का?) अयशस्वी झाला तरी त्यातील अनेक सहभागींना तो यशस्वी झाला असे वाटते. (घराबाहेर तर पडायला मिळाले, चार लोक भेटले, (निराळ्याच) संतापाला तर या निमित्ताने वाचा फुटली, इथपासून आपण 'क्रांतीदूत' इथपर्यंत).

मोर्चानंतर खरे काम सुरु व्हायला हवे - संबंधित नोकरशहांशी व लोकप्रतिनिधींशी संवाद, चिवट पाठपुरावा, त्यांना मोर्चाची उद्दिष्टे पटवणे, इत्यादी. हेही प्रत्येक वेळी होते असे नाही. म्हणजे सुरुवात आणि शेवट दोन्ही अधांतरी रहातात. मग Occupy Wall Street ही जागतिक भांडवलशाहीविरोधी चळवळ विरून गेली. अण्णा हजारेंची भ्रष्टाचारविरोधी चळवळ विरून जातात. त्या-त्या वेळेला गर्दी जमली, लोकांनी नारे दिले पण निष्पन्न किती झाले? संघटकांतील अंतर्गत रस्सी-खेचींमुळेही नंतर फाटाफूट होते. त्यात आता सोशल मीडियाची या संदर्भात दखल घेतली पाहिजे. ट्विटर, फेसबुक यांनी निषेधाचा ढांचा बदलला आहे. एका अभ्यासानुसार या माध्यमांनी उद्दिप्त निषेध जास्त करून संताप, उद्वेग, ताण यामुळे होतो, परिणामकारक सामाजिक बदल घडवून आणणारे दीर्घकालीन उपक्रम ही या मंडळींची प्रेरणा नसते. मग असे मोर्चे उथळ होतात - मोर्चासाठी मोर्चा.

दुसऱ्या बाजूने, मोर्चा ज्या कारणासाठी निघतो, ते आजपासून तीस-चाळीस वर्षांनी योग्य वाटू शकते किंवा आज सयुक्तिक वाटले तरी अल्पावधीत अप्रस्तुतही होऊ शकते. मार्टिन ल्यूथर किंगचे

वर्ण-द्वेषाविरुद्धचे मोर्चे त्या वेळी बहुतेक अमेरिकनांना अमान्य होते, ते मान्य व्हायला तीस वर्षे गेली.

बऱ्याचदा मोर्चांच्या मागण्यांमध्ये अंतर्विरोध असतो. उदा. ट्रम्पला ५३ टक्के गोऱ्या स्त्रियांनी मतदान केले. म्हणजे स्त्री-वादी मोर्चे बहुतांशी गोऱ्या अमेरिकन स्त्रियांचे प्रतिनिधित्व करत नव्हते. ज्या निषेध करतात, त्यांना ट्रम्पचा वर्ण-द्वेष, इस्लाम-द्वेष, स्थलांतरितांना परवानगी नाकारणे या गोष्टींची दखल घेणे भाग आहे. ती घेणे म्हणजे, त्यांचा कार्यक्रम पातळ होणे. म्हणून त्यात अंतर्गत मतभेद आहेत. पण हे झाले तरच मोर्चाचा विस्तृत विधायक कार्यक्रम -आघाडी - होऊ शकतो. त्यामानाने निश्चित ध्येय असणाऱ्या मोर्चांची (त्यांचे अल्पायुष्य पहाता त्यांना 'चळवळ' म्हणणे अवघड आहे) फलनिष्पत्ती दृश्य असते. जसे, द. कोरियाच्या, ब्राझीलच्या अध्यक्षांना सत्ता सोडावी लागली.

पण ट्रम्प-प्रवृत्तीची मर्यादित जाणीव आणि हटवादी सत्तेविरुद्ध कितीही मोठे मोर्चे निघाले, तरी पूर्वग्रहदूषित धोरणे बदलणे अवघड दिसते.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*